
## दिंडोरी, चांदवड तालुक्यातील सार्वजनिक मंडळांच्या गणेशमूर्तींचे दर्शन


रामेश्वरी मित्रमंडळ, श्री रामेश्वरी मंदिर, दिंडोरी


नागेश्वर मित्रमंडळ कोळीवाडा, दिंडोरी


युवक मित्रमंडळ, संभाजी चौक (गॅटी) दिंडोरी


न्यू स्टार मित्रमंडळ छत्रपती शिवाजी महाराज चौक


त्रिमूर्ती मित्रमंडळ संत रोहिदास नगर, दिंडोरी


कै. प्रकाश (बापू) देशमुख बाल मित्रमंडळ, दिंडोरी


कलाविश्व मित्रमंडळ, रोहिदासनगर, दिंडोरी


नटराज मित्रमंडळ पेठ गल्ली, दिंडोरी



गजराज कृषि उत्पन्न बाजार समिती मित्र मंडळाने साकारलेल्या जगतगुरू संत तुकाराम महाराज यांचा वैकुंठगमन सोहळ्याचा देखावा.


वरच्या गावातील त्रिलोक मित्रमंडळाने साकारलेला महादेव तपस्येचा मनमोहक देखावा


छत्रपती संभाजी महाराज फ्रेंड सर्कल, चांदवड


श्री संत गाडगेबाबा महाराज मित्रमंडळ, चांदवड



श्री संत राघोबा महाराज मित्रमंडळ, सोमवार पेठ


राजमुद्रा फ्रेंड सर्कल चांदवड

## थोडक्यात

### सुरगाणा येथे सांस्कृतिक स्पर्धा

**सुरगाणा ।** गणेशोत्सवाचे औचित्य साधून आव्हान ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष शामू पवार यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक नृत्य स्पर्धा उत्साहात पार पडल्या. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक नृत्य स्पर्धेत सहभागी झालेल्या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी ग्रुपचे संस्थापक शामू पवार, नगरसेविका अमृता पवार, कुणाल गायकवाड, दिनेश म्हसे, प्रवीण सुंगल, मुक्तार शेख, मंगेश पवार, राहुल पवार, राजेश भोये, अनिल भोये, रवी गायकवाड राम ठाकूर, आदी उपस्थित होते.

### शैक्षणिक साहित्यवाटप

**बोरगाव ।** सुरगाणा येथे इयत्ता ५ वी ते ७ वीतील एकूण ३५ होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व टी-शर्टचे मोफत वाटप करण्यात आले. शिक्षण हेच खरे सामर्थ्य आहे हा संदेश समाजात रुजवण्याचा यामागचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. याप्रसंगी ज्ञानेश्वर कराटे, भगवान हाडळ आदी उपस्थित होते.

### क्रीडादिन उत्साहात

**दिंडोरी ।** मोहाडी येथे मान्यवरांच्या हस्ते ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य ए. आर. गोसावी होते. त्यांनी क्रीडा प्रकारांविषयी माहिती दिली. खेळ, व्यायामाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. उन्नती जाधव, सूरज शिर्के, रूद्राक्ष चव्हाणके या विद्याथ्यर्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. वर्गशिक्षक तुषार गीते, क्रीडा शिक्षक सोनाली खरात यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन श्रावणी हिने केले.

### पावसाची रिमझिम

**दिंडोरी ।** रिमझिम पाऊस हजेरी लावत असल्याने पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव होत आहे. पिकांवर औषध फवारणी केली की लगेच पावसाने धुवून जात त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

# अवैध मद्य विक्रीविरोधात महिलांचा एल्गार

**पांडाणे । वार्ताहर**

दिंडोरी तालुक्याच्या पश्चिम भागात अवैध धंद्यांचे जाळे वाढल्याने तसेच अवैध मद्यविक्री वाढल्याने तरुण पिढीला व्यसनाधीन होण्यास हातभार लागत आहे, यातून सुटका व्हावी म्हणून महिलांनी एल्गार पुकारला आहे.

शासनाने परवाना नसलेल्या व प्रतिबंध असलेल्या कुठलाही व्यवसाय अथवा कोणतेही उत्पादन विक्री करण्यास मनाई घातलेली असतानादेखील हे व्यवसाय वणी, चंडीकापूर, मांदाणे, अहिवंतवाडी, जिरवाडे, अंबानेर, सागपाडा, फोफशी, काजीमाळे, करंजखेड, पांडाणे, चौसाळे, एकलहरे, खोरीपाडा, पिंगळवाडी, पिंप्री अंचला, हस्ते दुमाला, पुणेगाव, कोल्हेर, टाक्याचापाडा, कोशिंबे या परिसरात रोजरोसपणे सुरू आहेत. तसेच त्यांच्यात झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. त्याचबरोबर चहा विक्री आणि अल्पोहार



विक्रीच्या स्टॉलवर प्रतिबंधित उत्पादनासह मद्यविक्रीची विक्री सुरू आहे. त्यामुळे शेतात मजुरी करून आपला उदरनिर्वाह सांभाळणाऱ्या महिलांना आणि वयोवृद्धांना रस्त्याच्या कडेला जागोजागी विक्री होत असलेल्या मद्यविक्रीच्या ठिकाणांचा मनस्ताप होत आहे.

आतापर्यंत झालेल्या रोड अपघातात मद्यसेवन करून दुचाकी चालवणाऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामध्ये अनेक कुटुंबप्रमुख असलेले तरुण मृत्युमुखी पडून कुटुंब उघड्यावर पडल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. या अवैध व्यवसायांचा कायमचा बंदोबस्त व्हावा म्हणून आतापर्यंत परिसरातील बऱ्याच गावांच्या महिलावर्गाने, बचतगटाच्या महिलांनी त्याचबरोबर दारुबंदी महिला संघटनांनी अवैध दारू विक्रेत्यांवर मोर्चे काढून हाती लागलेला मद्यसाठा हस्तगत करून संबंधित विभागाला कळवून अशाप्रकारचे धंदे उधळून लावण्याचे प्रयत्न केले. पण याच व्यावसायीकांचे प्रत्येक गावात जवळचे दोन-चार हितचिंतक असल्याने ठिकाण बदलून त्या व्यवसायाचे बस्तान बसवण्यासाठी मदत करताता. उघड्यावरील दारू विक्रेत्यांवर संबंधित विभागाने वरवर कारवाई न करता समूळ उच्चाटन करून पुरवठा करणाऱ्या लाईन कायमस्वरुपी थांबवण्याची परिसरातून मागणी केली जात आहे.

# जानोरीत सजीव देखावे पाहण्यासाठी अलोट गर्दी

**जानोरी ।** येथे अनेक वर्षांपासून गावात गणेशोत्सवकाळात जिवंत देखाव्यांची परंपरा सुरू आहे. ही परंपरा करोनाकाळात बंद पडली होती. परंतु २०२१ नंतर तरुण पिढीने पुन्हा आपली कला दाखवण्यासाठी सुरुवात केल्याने गावात सजीव देखाव्यांची परंपरा पुन्हा सुरू झाल्याने ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला.

लहान-मोठी दहा ते पंधरा गणेश मंडळे आहेत. ती दरवर्षी वेगवेगळ्या आकाराच्या मूर्ती स्थापन करून दहा दिवस मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा करतात. या उत्सवात प्रत्येक मंडळ दररोज रात्री वेगवेगळे सजीव देखाव्याचे सादरीकरण त्यामध्ये ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, देवीदेवता, संस्कृती, शैक्षणिक, स्वच्छता अभियान, शेतकरी आत्महत्या अशा अनेक विषयांवर दररोज वेगवेगळे सजीव देखावे दाखवले जातात.

देखावे बघण्यासाठी परिसरातील ओझर, मोहाडी, आंबे, शिवनई, वरवंडी, अक्राळे, खतवड, साकोरे या गावांतून मोठ्या संख्येने ग्रामस्थ येतात. त्यामुळे गावास रात्रीच्या वेळेस जत्रेचे स्वरूप बघायला मिळत आहे.

### आरम नदीपात्रात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

**पिंपळदर । वार्ताहर**

आरई गावातील आराम नदी पात्रातील ब्रिटिशकालीन बंधाऱ्याजवळ एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

आराई गावचे पोलीस पाटील कारभारी भदाणे यांनी सटाणा पोलीस ठाण्यात या घटनेची माहिती दिली. मयत इसम ४० ते ४५ वर्ष वयोगटातील आहे. त्याच्या अंगावर लाल रंगाचा शर्ट, गळ्यात लाल दोरा त्यात घुंगरू व ताईत, तर उजव्या हातावर गोंदलेले आहे. मयत इसमाची ओळख पटली नाही. सटाणा पोलीस ठाण्यात याची अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस हवालदार पप्पू ठोके तपास करीत आहेत.

### लोककला विद्यापीठ स्थापना करा : प्रा. शेजवळ

**येवला ।** देशाच्या परिवर्तनशील लोकप्रबोधक कला, देशी-विदेशी खेळ तथा क्रीडा क्षेत्रातील उन्नतीसाठी कला, क्रीडा विद्यापीठ आणि जिल्हा, तालुकास्तरावर कला-क्रीडा विद्यालय स्थापन करण्यात यावे, अशी मागणी अध्यापक भारती व लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठानचे संस्थापक प्रा. शरद शेजवळ यांनी आहे. निवेदनात म्हटले आहे की, क्रीडा प्रशिक्षणाबद्दल फक्त घोषणाबाजी होते.

# बाजार समितीत बाजरी लिलाव

**मालेगाव । प्रतिनिधी**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात आज पहिल्यांदा या हंगामातील नवीन पावसाळी बाजरी विक्रीसाठी आली. ढवळेश्वर येथील शेतकरी साहेबराव रामचंद्र माळी यांनी ही नवीन पावसाळी बाजरी विक्रीसाठी आणली होती.

या बाजरीस आज झालेल्या लिलावात २ हजार ४०१ प्रती क्विंटल हा दर मिळाला. रोशन ट्रेडर्स



या खरेदीदार व्यापाऱ्याने ही बाजरी विकत घेतली. त्या प्रसंगी मालविक्रेत्या शेतकरी बांधवाचा बाजार समितीचे सचिव कमलेश पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी खरेदीदार व्यापारी सागर लिंगायत, लाला अग्रवाल, विनीत अमृतकर, संजय कमल, दिपक पाटकर, अनिल जगन्नाथ, अमित कैलास,पंकज दीपचंद आदीसह व्यापारी उपस्थित होते. यावर्षी तालुक्यात बाजरी पिकाचे क्षेत्र अधिक आहे. बाजरी काढणीचा हंगाम सुरू झाला आहे. यापुर्वीच बाजार समितीत नवीन मकाही विक्रीस आला. या दोन्ही धान्यांना बाजार समितीत चांगला बाजारभाव मिळत आहे. शेतकऱ्यांनी आपली बाजरी व मका बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात विक्रीसाठी आणावी. या शेतमालाचे पैसे रोख देण्यात येत असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती चंद्रकांत शेवाळे व सचिव कमलेश पाटील यांनी केले आहे.

# उस्थळे परिसरात बिबट्या जेरबंद

**पेठ ।** गेल्या अनेक दिवसांपासून उस्थळे व परिसरात वावर असलेला बिबट्या अखेर वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद झाला.

बिबट्याचा वावर असल्याची खात्री केली. या परिसरात पिंजरा लावण्याची ग्रामस्थांनी मागणी केल्यानंतर वनविभागाने बुधवारी सायंकाळच्या सुमारास स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने पिंजरा लावला. गुरुवारी पहाटेच्या सुमारास बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. याबाबत वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी योगेश साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक तानाजी भोये, मझहर शेख, दिलशान पठाण, भरत चौधरी, कुसुम गवळी यांच्यासह स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने बिबट्या रेस्क्यू करण्यात आला.

# ‘देशदूत’ निफाड कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते आरती

**निफाड । प्रतिनिधी**

‘देशदूत’ विभागीय कार्यालयाच्या वतीने श्रींची स्थापना कार्यालयात करण्यात आली. त्यानिमित्त निफाड कार्यालयात बाप्पांच्या आरतीसाठी सकाळी ओझरचे माजी जि. प. सदस्य बाळासाहेब जाधव, नांदूरमध्यमेश्वर माजी सरपंच तथा ज्येष्ठ शिवसैनिक शांताराम दाते, गोदावरी ऑफसेट संचालक रंगनाथ दाते यांच्या हस्ते







आरती झाली. यावेळी त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सायंकाळी ७ वाजता नाशिक जिल्हा ॲडव्होकेट फेडरेशन असोसिएशन सदस्य व वसंतराव नाईक सहकारी पतसंस्था संचालक ॲड. प्रभाकर केदार व पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य सचिव संजय लोंढे यांच्या हस्ते आरती झाली. यावेळी दोन्ही मान्यवरांचा ‘देशदूत’ निफाड विभागीय कार्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला.